# काव्यकुंज



## वृक्ष लावा

वृक्ष लावा घरोघरी
समृध्दी येईल आपल्याघरी !
स्वत :साठी सारे काही
निसर्गासाठी वेळच नाही !!
रामचंद्राचा संदेश हा हो छान,
वृक्षवल्ली हेची धन महान ,
झाडे लावू ... छान .. छान,
औषध फुले पाने मिळतील
गुणवान !!!
तुमचा धर्म नि माझा धर्म
सर्व धर्माची एकच शिकवण......
पर्यावरणाचे करुया रक्षण
चला चला झाडे लावू.......
विश्‍व पर्यावरण दिन ,
साजरा करु .......
कोण होतास तु माणसा
काय झालास तु,
ही किमया निसर्गाची ,
घेऊ काळजी जंगलांची,
बिघडू नका ... नका ...
समतोल पर्यावरणाचा,
नाही तर होईल
नाश तुमचा आणि
आम्हा मानवाचा .......

**रामचंद्र अर्जुन शिंदे**
नाशिक औ.वि.केंद्र

## बॅनर

पक्षाचा कार्यकर्ता माह्या घरी आला
एकशे पन्नास रुपये अन् फोटो घेऊन गेला
फोटो नेला तेव्हा माह्या आलं नाही लक्षात
कारण मी कधीच नव्हतो कोणत्याच पक्षात
म्हणे नेताजीच्या फोटो खाली तुह्या फोटो लाऊ
वाढदिवसाच्या शुभेच्छा आपण नेताजीले देऊ
नेताजीचा पूर्ण फोटो माही होती मुंडी
दुरुनच दिसे माह्या शर्टाले नव्हती गुंडी
नेतालीचा फोटो मोठा माह्या होता लहान
तरी मला वाटे आपण नेताजी पेक्षा महान
असे होतं बॅनरच एकंदरीत स्वरुप
कोणी म्हणे चांगल कोणी म्हणे कुरुप
एक दिवस नेताजीने जाळपोळ केली
पोलिसांनी मग धरपकड सुरु केली
नेताजीने स्वत:हाले अटक करुन घेतली
मंग भाऊ दंगल अधिकच पेटली
ज्याले त्याले विचारे कोणीचं ना सांगे
मग लागले पोलिस कार्यकर्त्यांचे मांगे
रात्री भाऊ पोलिस चौका मध्ये आले
चौकातले बॅनर पाहुन आंनदित झाले
तिथं माह्या फोटो पाहुन पोलिस आले घरी
मी होतो वावरात सोंगत होतो तुरी
अटक करु नका म्हटलं मी काय केला गुन्हा
पोलिस म्हणे तूच आहे कार्यकर्ता जुना
बरं झालं चौकामध्ये तुह्या फोटो होता लावुन
च्यार दिवस झाले तुलेच राहलो होतो पाहुन
पोरानं माही मंग जमानत घेतली
शुभेच्छा बॅनरन चांगलीच माही शेकली
तवापासुन बॅनरले एवढा मी भेतो
चौकात बॅनर दिसला की दुरुनच जातो.

**दिवाकर देशमुख**
चंद्रपूर .औ.वि.केंद्र